**स.के.नं. ७१२/२०२५**
**नि.क्र. ९/क च्या पुढे**

अभियोगपक्षातर्फे **साक्षीदार क्र.८** याची जबानी
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | - | **शिवराज मलिकार्जुन शेटे** |
| वय | - | **५६ वर्षे** |
| व्यवसाय | - | **डॉक्टर ( पॅनेसिया हॉस्पिटल सोनारी)** |
| राहणार | - | **कळंबोली** |

**सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती शितल पवार यांच्यामार्फत...**

१. मी घटनेच्यावेळी सोनारी येथील पॅनेसिया हॉस्पिटल येथे वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत होतो. या प्रकरणातील जखमी अखिलेश महातो माझ्याकडे तपासणी करिता दिनांक ०१.०१.२०२५ रोजी दुपारी २.५० च्या सुमारास आला होता. तो आमच्या दवाखान्यात स्वत:हून आला होता. त्यानंतर आम्ही पोलिसात माहिती दिली होती. त्या जखमी व्यक्तीस मी तपासले होते. माझे तपासणीत त्याचे उजव्या पायाला क्रश इंज्युरी झाल्याचे आढळून आले. ती जखम गंभीर स्वरूपाची अपघातात झालेली जखम होती. तसेच त्याच्या उजव्या हाताला व तोंडाला तसेच ओठाला किरकोळ जखमा होत्या. तसेच त्याच्या दाताला सुध्दा जखम झालेली होती. तसेच त्याच्या डाव्या तळपायाला डिग्लोटिंग स्वरूपाची जखम आढळून आली. त्याचा उजवा पाय गंभीर जखम झाल्याने खाली टेकत नव्हता. तसेच त्याच्या पायातून बरेच रक्त् जात होते. त्यामुळे आम्ही प्लास्टर करून अर्थोपेडीक सर्जनला बोलावले. त्यांनी ती जखम गंभीर स्वरूपाची असून दुरूस्त होणार नसल्याचे व पाय तोडावा लागणार

असल्याचे सांगितले. त्यामुळे आम्ही सदर रूग्णास येणा-या खर्चाबद्दल सांगितले असता त्यांना तो खर्च परवडणार नसल्याने त्यांना आम्ही शासकीय रूग्णालयात जाण्याचा सल्ला दिला परंतू ते नंतर कोणत्या दवाखान्यात गेले याची मला माहिती नाही. त्याला झालेली जखम सहा तासाच्या आतील होती. त्याला झालेल्या जखमा केवळ अपघातातमध्ये होउ शकतात. मी जखमी प्रमाणपत्रावर सदर रूग्णाची अंगठयाचा ठसा घेतला होता. आता मला ते जखमी प्रमाणपत्र दाखवले त्यावर सदर रूग्णांच्या अंगठयाचा ठसा तसेच माझी सही असून लिहलेला मजकूर बरोबर आहे. करिता सदर जखमी प्रमाणपत्रास **निशाणी क्रमांक पि ३/ पि डब्लू** ८ देण्यात येते.

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. जितेंद्र कातर्णे यांचेव्दारा ...**

२ आरोपीची त्याने कोणताही अमली पदार्थ घेतला होता किंवा नाही याची तपासणी केली होती परंतू तसे काही आढळून आले नाही. त्यासंबंधीचे कोणतीही कागदपत्रे तयार करण्यात आली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, आढळून आलेल्या जखमा त्या रूग्णांच्या निष्काळजीपणामळे होउ शकतात. हे म्हणणे खरे आहे की, तश्या जखमा मोठया वजनाच्या खाली चिरडल्याने गेल्याने होउ शकतात. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास नाही .**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृत**

सही/-

**उरण,** **(एस. पी. वानखडे)**

**दिनांक – १३.०३.२०२६** **न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, उरण**

**(न्यायालय क्र.२)**